अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/२२७९

दिनांक :-०८/०७/२०२०

-: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>
कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत शिक्षण विभाग (प्राथमिक) कडील उप शिक्षकांना आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे उपलब्ध करून देणेबाबत

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/माप्रवी/आस्था/१९८२ दि.२८/०६/२०२०

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे.त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळ्या स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

त्यानुसार शिक्षण विभाग (प्राथमिक)कडील उपशिक्षकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार उप आयुक्त आपत्ती व्यवस्थापन विभाग यांचे कार्यालयाकडे उपलब्ध करून देण्यात येत आहे. सबंधित कर्मचारी यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांचे नियंत्रणाखाली त्यांचे आदेशानुसार कामकाज करावयाचे आहे.

सदर कर्मचारी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणाऱ्या,हलगर्जीपणा करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सबंधित आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त कोरोना विषाणू आजाराच्या कामकाजाबाबत सदर कर्मचाऱ्यांचे आदेश आपले स्तरावरून प्रसृत करावेत.

वरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहेत. तसेच सदरचे सेवकांचे रुजू अहवाल सबंधित क्षेत्रीय कार्यालयाने उप आयुक्त (सामान्य प्रशासन)यांचेकडे सादर करावेत.

Rubal 8/7/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि/इ) यांना माहितीस्तव.

प्रती – १)उप आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन विभाग
२)प्रशासकीय अधिकारी,प्राथमिक शिक्षण विभाग ,पुणे महानगरपालिका